क्र.पोमसं/१७-अ/६१६२/जिल्हा नियोजन निधी-खरेदी/३४/२०२४ मुंबई, दिनांक - ०७/०५/२०२४

संदर्भ - या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/१७-अ/६१६२/जिल्हा नियोजन निधी-खरेदी/७३/२०२३, दि.१७/०३/२०२३ व दि.२६/०७/२०२३.

विषय - जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी तांत्रिक मान्यता देण्याबाबत.

* * * * *

संदर्भीय दि.१७/०३/२०२३ व दि.२६/०७/२०२३ ची परिपत्रके याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक -**

"जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनांतर्गत गृह विभागाच्या पोलीस विभागामध्ये विविध आस्थापनांकरिता पायाभुत सुविधा पुरविणे, CCTV यंत्रणेसह विविध तंत्रज्ञानविषयक प्रकल्प राबविणे तसेच वाहतूक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे," या नावाने जिल्हा वार्षिक योजनेखाली नियमित योजना सुरु करण्यास गृह विभाग, क्र.दुरुस्ती-०११७/प्र.क्र.६९/भाग-२/पोल-७, दि.२४/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयान्वये उक्त योजने खालील कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार हे **जिल्हाधिकारी-नि-सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,** यांना देण्यात आले असून शासन निर्णयातील जोडपत्रात निर्दिष्ट केल्याप्रमाणे अ.क्र. ६ नुसार दुचाकी व चारचाकी वाहने खरेदी करणे, शस्त्रे व दारुगोळा खरेदी, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार **पोलीस महासंचालक** यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच, गृह विभाग, क्र.एमआयएस-१३१५/प्र.क्र.२३३/पोल-४, दि.१३/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये पोलीस महासंचालक यांच्या स्तरावरील **अपर पोलीस महासंचालक (नि. व स.)** यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीची रचना खालील प्रमाणे विहित करण्यात आली आहे:-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) | - | अध्यक्ष |
| (२) | सह पोलीस आयुक्त (प्रशासन), मुंबई | - | सदस्य |
| (३) | विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, दादर, मुंबई | - | सदस्य |
| (४) | सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.) | - | सदस्य सचिव |
| पोलीस महासंचालक स्तरावरील उपरोक्त तांत्रिक समितीसमोर ज्या-ज्या विभागांचे / विभाग प्रमुखांचे खरेदीचे प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात येतील, त्यावेळेस त्या-त्या विभागांचे / विभाग प्रमुखांचे प्रभारी किंवा प्रतिनिधी यांना सदर तांत्रिक समितीच्या बैठकीस निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात यावे. | | | |

**२. वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्याअनुषंगाने तांत्रिक मान्यता देण्यासाठीचे प्रस्ताव पोलीस घटक कार्यालयांकडून या कार्यालयास प्राप्त होत असून त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत :-**

१) खरेदी करावयाचे साधनसामुग्रीचे विनिर्देश व दर हे GeM पोर्टलवरुन घेतले नसतात.

२) खरेदी करावयाचे साधनसामुग्रीचे दर हे कोणत्यातरी एका पुरवठादाराकडून घेतले असतात.

३) साधनसामुग्रीचा प्रति नग दर व एकूण नगांसाठी येणाऱ्या खर्चाची माहिती दर्शविली नसते. तसेच, त्याचे विनिर्देश जोडले नसतात.

४) प्रस्तावित केलेल्या साधनसामुग्री मध्ये सध्य:स्थितीत किती नग उपलब्ध आहे, व त्यापैकी किती दुरुस्त व ना-दुरस्त आहे व त्याचा उपयोग काय ? याबाबतची माहिती नमूद केलेली नसते.

५) बी.डी.डी.एस. विभागांतर्गत यंत्रसामुग्री, साधनसामुग्री संदर्भात घटक कार्यालयांकडून पाठविलेल्या प्रस्तावांमध्ये वेग-वेगळे विनिर्देश व वेग-वेगळे दर दिले असल्याचे निदर्शनास आले आहे.

६) प्रस्तावास मान्यता देण्यासाठी आयोजित केलेल्या तांत्रिक समितीच्या बैठकीवेळी घटक कार्यालयांकडून पाठविण्यात येणाऱ्या प्रतिनिधींना (१) साधनसामुग्रीचे विनिर्देश व दर कशा प्रकारे निश्चित केले आहेत, (२) साधनसामुग्रीची खरेदी कशा प्रकारे करण्यात येणार आहे, याबाबतचे ज्ञान नसते. तसेच, (३) साधनसामुग्रीच्या उपयोगाबाबत प्रश्न विचारले असता त्यांना योग्य स्पष्टीकरण सादर करता येत नाही.

**३. अशाप्रकारे आढळून आलेल्या त्रुटींमुळे जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यासाठी अडचण निमार्ण होत असल्याने यापुढे पुढील प्रमाणे निर्दिष्ट केल्यानुसार तांत्रिक मान्यता देण्यासाठीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत :-**

(१) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये गर्व्हनमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तु व सेवांची खरेदी करण्यास, खरेदी धोरण दि.१/१२/२०१६ मधील नियम २.४ मध्ये नमूद केलेल्या लक्षांकित विभागांना / कार्यालयांना बंधनकारक केले आहे.

तसेच,

उद्योग विभागाने तयार केलेली कार्यपध्दती / नियम पुस्तिकेनुसार आणि गृह विभाग, शासन निर्णय, क्र.पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४, दि.३१/०७/२०१९ मधील तरतुदीनुसार यंत्रसामुग्री, साधनसामुग्री खरेदी करावयाचे ठरल्यानंतर विभागाची गरज लक्षात घेऊन त्याअनुषंगाने नि:पक्षपातीपणे तांत्रिक विर्निदेश (Technical Specification) ठरविण्यासाठी **घटक कार्यालयाच्या स्तरावर तांत्रिक समिती गठित करुन सदर समिती मार्फत आवश्यक यंत्रसामुग्री, साधनसामुग्रीचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) निश्चित करावेत. तांत्रिक समितीने निश्चित केलेल्या विनिर्देशानुसार GeM पोर्टलवर उपलब्ध असलेल्या प्रति नग दराची खात्री करुन प्रति नग दरासह विनिर्देशाच्या प्रती सादर कराव्यात.**

(२) प्रस्तावित करावयाची यंत्रसामुग्री, साधनसामुग्री GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास उद्योग ऊर्जा व कामगार विभागाचे खरेदी धोरण दि.१/१२/२०१६ मधील नियम ३.१.२.२ मधील तरतुदीनुसार खुल्या बाजारातील एक किंवा अधिक संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील दराची खात्री करुन दर निश्चित करावे व त्याच्या प्रती प्रस्तावासोबत सादर कराव्यात. तसेच, सदर साधनसामुग्रीची खरेदी ई-निविदाद्वारे mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येणार असल्याची बाब प्रस्तावात नमूद करावी.

(३) साधनसामुग्रीचा प्रति नग दर व एकूण नगांसाठी येणाऱ्या खर्चाची माहिती दर्शवावी.

(४) प्रस्तावित केलेली साधनसामुग्री सध्य:स्थितीत किती नग उपलब्ध आहे, व त्यापैकी किती दुरुस्त व ना-दुरस्त आहे व त्याचा उपयोग काय ? याबाबची माहिती दर्शविणारा तक्ता सादर करावा.

(५) बी.डी.डी.एस. विभागांतर्गत साधनसामुग्री संदर्भात बहुतांश विनिर्देश हे गृह मंत्रालय, भारत सरकार (Ministry of Home Affairs) / राष्ट्रीय सुरक्षा बल (NSG) / केंद्रीय राखीव पोलीस बल (CRPF) यांनी ठरवुन दिले असल्याने सदर विनिर्देशानुसार GeM पोर्टलवरील दर प्रस्तावात नमुद करावे.

(६) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) या खाली (District Planning Development Council) कोणत्या वित्तीय वर्षात किती निधी उपलब्ध होणार आहे, याबाबतचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश अथवा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती प्रस्तावासोबत जोडण्यात येत नसल्याने सदर प्रस्तावाला जिल्हा वार्षिक योजनेतून **"निधी उपलब्धता"** होत असल्याची स्पष्टता येत नाही. त्यामुळे उक्त नमुद कागदपत्रांच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर करावे.

(७) बिनतारी दळणवळण यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीच्या बाबतीत अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फतीने त्यांचे अभिप्रायासह प्रस्ताव सादर करावेत.

(८) **प्रस्तावास मान्यता देण्यासाठी** आयोजित केलेल्या तांत्रिक समितीच्या बैठकीवेळी, प्रस्तावित केलेल्या साधनसामुग्रीच्या **विनिर्देशाबाबत,** त्याच्या दराबाबत, त्याच्या उपयोगितेबाबत तसेच, सदरहु साधनसामुग्री **कशाप्रकारे खरेदी करण्यात येणार** आहे याबाबतच्या माहितीसह माहितगार प्रतिनिधी यांना पाठविण्यात यावे. **अपुर्ण ज्ञान असलेले** प्रतिनिधी पाठवू नये.

(९) **यंत्रसामुग्री, साधनसामुग्री खरेदी** करण्यास तांत्रिक मान्यता मिळण्यासाठी पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये खालील विवरणपत्रानुसार माहिती भरुन वरील मुद्यांची पुर्तता करुन आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव **सादर करावा.**

| अ.क्र. | साधनसामुग्रीचे नाव | आवश्यक नग | GeM पोर्टलवरील प्रति नग दर | GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास खुल्या बाजारातून निश्चित केलेला प्रति नग दर | एकूण किंमत | खरेदी कशा प्रकारे करण्यात येणार आहे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | GeM Portal | Mahatender |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

**४. तरी घटक प्रमुखांनी खरेदीचे प्रस्ताव सादर करतांना वरील प्रमाणे दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा अपुर्ण स्थितीत प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी.**

( सुनील रामानंद )
अपर पोलीस महासंचालक (नि. व स.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग / प्रशिक्षण व खास पथके / दहशवाद विरोधी पथक / वाहतूक / फोर्स वन / नाहर्स / राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १७ / १८ / ३६ (पोमसं कार्यालय)
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष (पोमसं कार्यालय)

२. सदरहू परिपत्रक www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पुढील २ महिन्यासाठी ठेवण्यात यावे.